मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. १५/०६/२०२६

प्रकरण क्र. ४८:- **दि. ८/०४/२०२६ व दि. २१/०४/२०२६ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.**

ठराव क्र. ४५ :-

दि. ८/०४/२०२६ व दि. २१/०४/२०२६ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांमध्ये सन्मा. सदस्यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्तीसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सुचक :-
श्री० भगवती शर्मा

अनुमोदन :-
श्री. अनिल र. बिराणी

ठराव सर्वानुमते मंजुर

सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. 15/06/2026

// ठराव //

प्रकरण क्र. ४९ :- **सन 2013-14 ते 2020-21 ची सुरक्षा अनामत व्यपगत करुन रक्कम कर्ज निवारण निधी खाती वर्ग करुन त्यामधून कर्ज हप्ता अदा करणेबाबत तसेच व्यपगत सुरक्षा अनामतीची मागणी झाल्यास परतावा करणेच्या मंजुरीबाबत.**

ठराव क्र. ४६ :-

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2013 मधील परिच्छेद क्र.299 नुसार तसेच राष्ट्रीय महानगरपालिका लेखा नियम पुस्तिका 2004 मधील परिच्छेद 11.16 मध्ये नमुद केलेनुसार परतावायोग्य ठेवीचा तीन पूर्ण लेखांकन वर्षाकरिता दावा सांगण्यात आला नाही अशा ठेवी व्यपगत करणे आवश्यक आहे. त्यानुसार सन 2013-14 ते 2020-21 या कालावधीतील सद्यःस्थितीनुसार प्रलंबित असलेली सुरक्षा अनामत ठेवींची रक्कम खालीलप्रमाणे व्यपगत करणेची आहे.

प्रलंबित असलेल्या सुरक्षा अनामत रक्कमेचा गोषवारा

वित्तीय वर्ष	प्रलंबित असलेल्या सुरक्षा अनामतीची संख्या	प्रलंबित असलेल्या सुरक्षा अनामतीची रक्कम
सन 2013-14	17	1472676.00
सन 2015-16	1	70053.00
सन 2016-17	1072	143216386.00
सन 2017-18	1404	108131251.00
सन 2018-19	1416	182364090.00
सन 2019-20	2	734893.00
एकूण		43,59,89,349

सदर व्यपगत केलेली सुरक्षा अनामतीची रक्कम रु.43,59,89,349/- ही कर्ज निवारण निधी खात्यात वर्ग करुन त्यामधून कर्ज मुद्दल हप्त्याची जून 2026 अखेरपर्यंत प्रलंबित असलेली रक्कम रु.48,94,96,209/- भरणा करणेचा खर्च भागविण्यास व सदर अनामत खात्यातून काढण्यात आलेली रक्कम ही यथावकाश पुनश्चः सुरक्षा अनामत खाती वर्ग करणेत येण्यास मान्यता देणेत येत आहे.

उपरोक्त व्यपगत करण्यात येणाऱ्या ठेवी महसूली खाती जमा करण्यात येतील. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2013 मधील परिच्छेद क्र.299 नुसार व्यपगत ठेवींच्या परताव्याची मागणी प्राप्त झाल्यास असा परतावा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सूचक :- श्री. भगवती शर्मा

अनुमोदन :- श्रीम. वंदना भानसर

ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका
मा. स्थायी समिती सभा दि. १५/०६/२०२६

// ठराव //

प्रकरण क्र. 50 : प्रारूप प्रभाग रचना व अंतिम प्रभाग रचना तयार करणेचे केलेले कामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची "ड" प्रकरण 5(2)(2) अन्वये मंजूरी मिळणे बाबत.

ठराव क्र. ४८ :

मा.राज्य शासनाने/राज्य निवडणूक आयोगाने महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक २०२५ करीता प्रारुप प्रभाग रचना तयार करण्याबाबत मा. आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करणे बाबत सुचित करुन प्रारुप प्रभाग रचनेचे वेळापत्रक जाहीर केले होते. त्याअनुषंगाने सदरकामी मे. अल्टीमेट इन्फॉरमेशन टेक्नॉलाजी प्रा.लि. यांनी वाटाघाटी अंती सर्व करासहीत रु ५,०२,०००/- इतक्या रक्कमेचे दरपत्रक सादर करुन प्रारुप प्रभाग रचना व अंतिम प्रभाग रचना सॉफ्टवेअरच्या सहाय्याने तयार करणे करीता संगणक प्रणाली सेवा सुविधा पुरविणे इत्यादी कामे मा.राज्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे मुदतीत करावयाचे मान्य केले होते.

सदर काम गोपनीय रितीने,योग्य पध्दतीने व अतिशय जलद पध्दतीने करावायाचे असल्याने सदर निवडणूकीच्या कामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची "ड" प्रकरण ५, (२)(२) अन्वये मा.आयुक्त यांनी दि.०३/०५/२०२५ रोजी मान्यता दिली आहे. त्यानुसार दि. ०३/०७/२०२५ रोजी मे. अल्टीमेट इन्फॉरमेशन टेक्नॉलाजी प्रा.लि.यांना सदर कामाचा "कार्यादेश" दिला असुन दिनांक ०४/०७/२०२५ रोजी करारनामा केला आहे. सदर कामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३(ड) अन्वये प्रशासकिय ठराव क्र.१८६ दि.३१/०७/२०२५ अन्वये मंजूरी प्राप्त आहे. मात्र सदरचे काम हे निविदा / दरपत्रक न मागविता केले असल्याने सदर कामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची "ड" प्रकरण ५, (२)(२) अन्वये मा. स्थायी समिती सभेची मंजूरी आवश्यक आहे.

प्रशासनाने सादर केलेल्या गोषवाऱ्यानुसार प्रभाग रचनेचे काम मे. अल्टीमेट इन्फॉरमेशन टेक्नॉलाजी प्रा.लि. यांचेकडून करुन घेतले असल्याने त्यास व सदरकामी मे. अल्टीमेट इन्फॉरमेशन टेक्नॉलाजी प्रा.लि. यांना रक्कम रु. ५,०२,०००/- अदा करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची "ड" प्रकरण ५, (२)(२) अन्वये ही सभा मंजुरी देत आहे, असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :-
M.R. Vilanni
श्री. अनिल विरोणी

अनुमोदक:-
श्री. मनोज दुबे

सभापती,
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.स्थायी समिती सभा दि. 15/06/2026

// ठराव //

प्रकरण क्र. ५१ : भारताची जनगणना २०२७ करीता मिरा भाईंदर महानगरपालिका शहारातील संपूर्ण लोकसंख्या गणना करण्याच्या कामकाजाकरीता ०८ तांत्रिक सहाय्यक यांची जाहिरातव्दारे निविदा प्रसिध्द करणेबाबत...

ठराव क्र. ४८ :

भारताची जनगणना २०२७ करीता मिरा भाईंदर महानगरपालिका शहारातील संपूर्ण लोकसंख्या गणना करण्याच्या दृष्टीने कार्यक्रम जाहिर झालेला आहे.

मे. भारत सरकार निर्देशित व महाराष्ट्र शासन पुरस्कृत जनगणना २०२७ बाबतची अधिसुचना महाराष्ट्र शासनाने दि. ११/०७/२०२५ रोजी प्रस्तुत केली असून महापालिका क्षेत्रातील जनगणना २०२७ चे कामकाज कालबध्द मुदतीत पुर्ण करणेकरीता जनगणना अधिनियम १९४८ मधील कलम ४ व सुधारणा जनगणना नियम १९९० कायदेशीर तरतुदीच्या अधिन राहून कामकाज करावयाचे आहे.

त्याअनुषंगाने सेवानिवृत्त प्रशासकीय अधिकारी (वर्ग ०२) व जनगणना करीता तांत्रिक सहाय्यक या पदावर यांची नियुक्ती करणेकरीता दि. २३/०२/२०२६ रोजी जाहिर सूचना प्रसिध्द करण्यात आलेली होती. सदर जाहिरातीमध्ये तांत्रिक सहाय्यक या संवर्गाची ०२ पदे दर्शविण्यात आलेली आहेत. परंतु जनगणनेकरीता एकुण ०८ तांत्रिक सहाय्यक यांची आवश्यकता आहे. त्याकरीता अतिरिक्त ०६ तांत्रिक सहाय्यक पदाकरीता शुध्दीपत्रक देऊन तांत्रिक सहाय्यक संवर्गाच्या ०८ पदांकरीता व प्रशासकीय अधिकारी (वर्ग (जनगणनेकरीता) ०१ पदाकरीता आयोजित केलेली दि.२७/०२/२०२६ रोजीची मुलाखत रद्द करून दि. ०४/०३/२०२६ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी ०१.०० वाजेपर्यत मुलाखत (Walk in Interview) आयोजित केली असल्याबाबतचे दि.२६/०२/२०२६ रोजी शुध्दीपत्रक प्रसिध्द करण्यात आले होते.

त्यानुसार दि. ०४/०३/२०२६ रोजी मुलाखत (Walk in Interview) घेण्यात आली. सदर मुलाखतीमध्ये मा. निवड समितीने दिलेल्या गुणानुक्रमे पात्र उमेदवारांची निवड केलेली आहे. त्याअनुषंगाने प्रशासकीय अधिकारी (वर्ग-०२) यांना नियुक्ती आदेश देण्यात आलेले आहे. परंतु, तांत्रिक सहायक (जनगणनेकरीता) या पदांकरीता जनगणना कार्य निर्देशलाय, महाराष्ट्र यांनी दि.२४/१२/२०२५ रोजीच्या व सुधारित परिपत्रान्वये त्यांची निवड outsourcing agency मार्फत घेणेबाबत निर्देश दिलेले आहेत. परंतु मिरा भाईंदर महानगरपालिकेने तांत्रिक सहायक (जनगणनेकरीता) ठोक मानधनावर नियुक्त करणेची प्रकिया पूर्ण केलेली होती. त्याअनुषंगाने मा. संचालक तथा मुख्य प्रधान जनगणना अधिकारी, जनगणना संचानालय यांच्याकडे उक्त विषयाबाबत दि. ११/०३/२०२६ रोजीच्या पत्रान्वये मार्गदर्शन मागविण्यात आले होते. त्यानुसार जनगणना संचानालय यांनी भ्रमणध्वनी व व्हिडिओ कॉन्फरेन्स द्वारे दि. २५/१२/२०२५ रोजीच्या व सुधारित परिपत्रान्वये outsourcing agency मार्फत कार्यवाही करणेबाबत मौखिक निर्देश दिलेले आहेत.

भारताची जनगणना २०२७ करीता मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शहरातील संपुर्ण लोकसंखेच्या कामकाजासाठी जनगणना करीता तांत्रिक सहाय्यक यांची शैक्षणिक अर्हता व पात्रता खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	पदनाम व पदसंख्या	शैक्षणिक अर्हता
१.	जनगणना करीता तांत्रिक सहाय्यक (पदसंख्या – ०८)	मान्यताप्राप्त विद्यापिठाची अभियांत्रिकी शाखेची / माहिती तंत्रज्ञानातील विज्ञान पदवी

सदर कामकाजाकरीता जास्तीत जास्त १८ महिन्याचा कालावधी लागणार आहे. तसेच तांत्रिक सहाय्यक (जनगणनेकरिता) या पदाकरिता संगणकाची माहिती असणे आवश्यक आहे. सबब ८ तांत्रिक सहाय्यक (जनगणनेकरिता) outsourcing agency मार्फत प्रतीमहा रु.२५,०००/- प्रति तांत्रिक सहाय्यक प्रमाणे मासिक रु.२,००,०००/ वार्षिक रु.२४,००,०००/- व १८ महिनेकरिता रु.३६,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च जनगणना कार्यालयाकडून अदा करण्यात येणार आहे.

प्रशासनाने सादर केलेल्या गोषवाऱ्यानुसार भारताची जनगणना २०२७ करीता मिरा भाईंदर महानगरपालिका शहारातील संपूर्ण लोकसंख्या गणना करण्याच्या कामाकजाकरीता ०८ तांत्रिक सहाय्यक पुरवठा करणेकरीता जाहिर निविदा सुचना वृत्तपत्रात व संकेतस्थळावर प्रसिध्द करणेस व प्रतिमहा मानधनापोटी रू.२५०००/- प्रमाणे १८ महिनेकरिता रु.३६,००,०००/- पर्यंतच्या होणाऱ्या खर्चास ही सभा मान्यता देत आहे, असा ठराव मी मांडत आहे.

सुचक : श्री. भगवती शर्मा

अनुमोदन : श्री. आनंद दामोदर मांजरेकर

ठराव सर्वानुमते मंजूर

मा. सभापती
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दिनांक. १५/०६/२०२६

प्रकरण क्र. ५२ :- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मालमत्तांचे मुल्यांकन करणे कामाबाबत.

ठराव क्र. ४९ :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध मालमत्तांचे दरवर्षी मुल्यांकन करुन माहिती अद्यावत ठेवावे लागते. तत्कालीन नगरपरिषदेची स्थापना झाल्यापासून सदर मुल्यांकनाचे काम करण्यासाठी मे.आर्किझम यांना नेमण्यात आले होते. त्यांचेमार्फत सन १९८५ ते २०१० पर्यंत मालमत्तांचे मुल्यांकन करुन महानगरपालिकेस सर्व अहवाल सादर करण्यात आले आहेत. सदर मुल्यांकनाकरीता होणारी फी ही जास्त असल्याने व महानगरपालिकेने सदर फी दिली नसल्याने मे.आर्किझम यांना मा.न्यायालयात दावा दाखल केला आहे. (दावा क्र.एस.पी.एल./क्र.६००/२०१९) मा.न्यायालयाच्या निर्देशानुसार सदर फि बाबत महानगरपालिकेने वेळोवेळी बैठका घेऊन व तडजोड करुन सदर फी रु.७,२३,०४,२५३/- ऐवजी रु.३,९०,३४,२५७/- एवढी ठरविलेली आहे. मा.विशेष महासभा दि.२७/०३/२०२६ ठराव क्र.३२ अन्वये सदर फि देण्यास मान्यता प्राप्त झाली आहे.

महानगरपालिकेच्या आर्थिक हिताचा विचार करून समझोता करणेकरीता Consent Term चा मसुदा तयार करण्यात आला आहे. तरी सदर Consent Term चा मसुदा अंतिम करून मा.न्यायालया समोर दाखल करणे आवश्यक आहे.

CONSENT TERMS :-

CONSENT TERMS BY AND BETWEEN THE PLAINTIFF AND DEFENDANTS IS AS UNDER:-

1. The Defendants have assigned the work of valuation of properties of the Mira Bhayander Municipal Corporation and Depreciation Fund in respect of the Properties of the Defendant Corporation such as Roads, Drainages, Gardens, Playgrounds, Open Spaces, Schools, Gymnasiums, Offices, Community Centers, Crematories, Water Tanks, Fire Brigade Buildings etc. as per the Work Order No.MBMC/ PWD/6628/06-07 Dated 01.02.2007.
2. The Plaintiff, pursuant to the Agreements dated 31.07.2002, dated 21.06.2005 and dated 23.04.2010 has completed his work and assignments and have provided the necessary services to the MBMC. The Plaintiff has submitted to the Defendant Corporation, the detail Reports for the work of valuation of properties of the Corporation and Depreciation Fund in respect of the properties of the MBMC such as, Roads, Drainages, Gardens, Play Grounds, Open Spaces, Schools, Gymnasiums, Offices, Community Centre, Crematories, Water Tanks, Fire brigade Buildings etc.
3. The Defendant Corporation, vide its letter dated 02.09.2013, 23.09.2013 and 22.08.2019 addressed to the Plaintiff, has directed the Plaintiff to attend the Commissioner's Office, and submit the presentation of the concerned Works in the presence of the Municipal Commissioner. The Plaintiff, accordingly on 28.10.2014, attended the Commissioner Office and has submitted the presentation of the Works done by the Plaintiff through

Audio – Visual C.D. The copy of the presentation and the concerned C.D. was also provided and submitted to the Public Works Department of the Defendant Corporation.

4. The Plaintiff vide his letter dated 19.05.2015 addressed to the Commissioner of Defendant Corporation and letter dated 01.03.2016 addressed to the City Engineer of Defendant Corporation has requested the Defendant Corporation to make the payment of the concerned Bill No. I-2010-11 dated 16.08.2010 issued and given by the Plaintiff to the Defendant Corporation.

5. The Plaintiff through his Advocate, has filed Special Civil Suit No.600/2019 against Defendant Corporation and have demanded payment of Rs.7,23,04,253/- (Rupees Seven Crore Twenty Three Lakhs Four Thousand Two Hundred Fifty Three Only) being the amount of the Bill No. I-2010-11 dated 16.08.2010 issued and given to the Defendant Corporation by the Plaintiff.

6. Pending the present Civil Suit in the Hon'ble Civil Court, Thane, the Defendant and the Plaintiff, have conducted a joint meetings amongst them, in the office of Defendant Corporation for resolving the dispute between the Plaintiff and the Defendants, in respect of payment of outstanding Bill No. I-2010-11 dated 16.08.2010 and has agreed to settle the dispute of payment of the said Bill by filing Consent Terms in the above mentioned case, as under :-

TERMS OF SETTLEMENT

1. The Defendant No.1 Corporation had appointed M/s. Padilkar Consultant on 17.07.2015, for the purpose of valuation of property for the period commencing from 01.04.2007 and their rate of valuation of property was Rs.19,28,570/- per annum. Considering this, on the basis of the said valuation rate, the professional charges payable to Mr. Archisum for the valuation of property done by them for 23 years, amounts to Rs.4,33,00,000/- (Rupees Four Crores Thirty Three Lakhs). However, as per the general Guidance Instruction Order No.15/ Term 2025-26/387 dated 31.03.2025, issued by the office of Registration and Stamps, Thane after, calculating depreciation for every year, the amount of Bill payable to M/s. Archisum is calculated at Rs.3,90,00,000/- (Rupees Three Crore Ninety Lakhs Only). Hence, after consulting with M/s. Archisum i.e. the Plaintiff, the amount payable to them is finalised for Rs.3,90,00,000/- (Rupees Three Crore Ninety Lakhs Only).

   On the basis of the aforesaid facts, an amount of Rs.3,90,00,000/- (Rupees Three Crore Ninety Lakhs Only), is finalized and will be paid to M/s. Archisum i.e. the Plaintiff by the Defendant Corporation on passing of final decree as early as possible on availability of fund in the Corporation.

2. The Plaintiff shall not claim and demand any amount other than the amount mentioned in this Consent Terms, towards his claim against the Defendants in respect of the Bill dated 16.08.2010 and the amount mentioned in this Consent Terms is payable to the Plaintiff by the Defendants in full & final satisfaction of the

claim of the Plaintiff against the Defendants.

3. The final Decree be kindly drawn, in terms of Consent Terms.

4. The Plaintiff and the Defendants shall bear their own costs.

प्रशासनाने सादर केलेल्या गोषवाऱ्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मालमत्तांचे मुल्यांकन करणे कामा संदर्भात देयक अदा करणे कामी प्रस्तावित केल्यानुसार मा. न्यायालयासमोर Consent Term दाखल करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४८१(ह) व (आय) नुसार या ठरावाद्वारे मान्यता देण्यात येत आहे. पारीत ठरावानुसार संबंधित विभागाने नियमानुसार कार्यवाही प्रस्तावित करावी.

सुचक:- श्री. भगवती शर्मा

ठराव सर्वानूमते मंजूर
ठराव वाचून कायम करण्यात आला.

अनुमोदन :- श्री. हेतल परमार

सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

सचिव विभाग

मा. स्थायी समिती सभा दि. १५/०९/२०२६

प्रकरण क्र. ५३ :- महानगरपालिकेच्या मा. महासभा व मा. स्थायी समिती सभांना चहा, नाश्ता व जेवण पुरवठा केलेबाबत कामास महाराष्ट्र महानगरपालिका "अनुसूची ड" प्रकरण ५, कलम २(२) अन्वये मंजुरी मिळणेबाबत.

ठराव क्र. ५० :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मा. महासभा व मा. स्थायी समिती सभांना चहा, नाश्ता, जेवण व इतर आवश्यक खाद्यपदार्थ पुरवठा करणेकामी मा. स्थायी समिती सभा दि. ०२/०८/२०२२, ठराव क्र ९० अन्वये श्री. साई कॅटरर्स यांची प्राप्त निवीदा स्विकारुन ५ वर्षाच्या मुदतीकरीता स्विकारणेस मान्यता दिलेली आहे. तद्अनुषंगाने श्री. साई कॅटरर्स यांस या कार्यालयाकडील जा.क्र. मनपा/सचिव/६६/२०२२-२३, दि. ०२/०८/२०२२ अन्वये कार्यादेश देण्यात आलेला आहे. श्री. साई कॅटरर्स यांनी दि. १८/०२/२०२६ ते दि. ०८/०४/२०२६ पर्यंत पार पडलेल्या मा. महासभा व मा. स्थायी समिती सभा तसेच महानगरपालिकेच्या विविध पदाधिकारी निवडणूकीकरिता चहा, नाश्ता व जेवण व इतर आवश्यक खाद्यपदार्थ पुरवठा समाधानकारक केलेला असून, त्यांचे एकुण देयक रु. २,०७,५१९/- इतके होत आहे.

तथापी, सदर निवीदा दरपत्रकाद्वारे मागविण्यात आलेली असल्याने, उक्त खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका "अनुसूची ड" प्रकरण ५, कलम २(२) अन्वये मान्यता घेणे आवश्यक आहे. तरी मा. महासभा व मा. स्थायी समिती सभांना तसेच महानगरपालिकेच्या विविध पदाधिकारी निवडणूकीकरिता श्री. साई कॅटरर्स यांनी पुरवठा केलेल्या चहा, नाश्ता, जेवण व इतर आवश्यक खाद्यपदार्थ या कामी झालेला खर्च रु. २,०७,५१९/- अदा करणेस तसेच याकामी नव्याने निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत मे. श्री. साई कॅटरर्स यांचेकडून चहा, नाश्ता, जेवण व इतर आवश्यक खाद्यपदार्थ पुरविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु. ५.०० लक्ष पर्यंतच्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका "अनुसूची ड" प्रकरण ५, कलम २(२) अन्वये ही सभा मान्यता देत आहे असा मी ठराव मांडीत आहे.

सूचक :- श्री. अनिल विरानी

अनुमोदन :- सौ. हेतल परमार

ठराव सर्वानुमते मंजुर

सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

(बांधकाम/विद्युत विभाग)

मा. स्थायी समिती सभा दि.15/06/2026

प्रकरण क्रमांक. (54) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या पॅनलवर Urban Traffic Studies करीता सल्लागार नेमणेबाबत.

ठराव क्रमांक. (५९)

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील वाहतुक व्यवस्था संबंधित चर्चा करण्यासाठी मा. पोलिस आयुक्त, मिरा भाईंदर वसई विरार पोलिस आयुक्तालय व त्यांचे अधिकारी यांची मा. महापौर मिरा भाईंदर महानगरपालिका, मा. आमदार श्री. नरेंद्र मेहता, मा. आयुक्त, मिरा भाईदर महानगरपालिका व महानगरपालिकेचे संबंधित अधिकारी यांची संयुक्त बैठक पार पडली.

सदर बैठकीत मा. पोलिस आयुक्तांच्यामार्फत मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील वाहतुक व्यवस्था करावयाची कार्यवाही याबाबत चर्चा तसेच सादरीकरण करण्यात आले. सदर चर्चेवेळी मिरा भाईंदर महानगरपालिकेकडून वाहतुक व्यवस्थेबाबत सर्वेक्षण अभ्यास करणे, उपाययोजना सुचविणे व त्यांची अंमलबजावणी करणेसाठी सल्लागार नेमणेबाबत निर्देश देण्यात आले.

त्याअनुषंगाने मे. सस्टेनन्सी कंन्सल्टंट प्रा.लि. यांचेमार्फत Urban Traffic Studies साठी त्यांना सल्लागार नेमणेकरीता दि.30/04/2026 रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव प्राप्त झाला आहे.

मा. सर्वोच्च न्यायालय यांचेकडील दि.07/10/2025 रोजीच्या आदेशानुसार पादचारी व वाहने यांच्या सुरक्षतेसाठी विविध उपाययोजना करणेबाबत सुचवुन मा. आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली यांचा आढावा घेणेसाठी समिती गठीत करण्यात आली आहे. सोबत मा. सर्वोच्च न्यायालय यांचेकडील आदेश खालीलप्रमाणे आहेत.

The Hon'ble Supreme Court of India by its order dated 07/10/2025 passed in Writ Petition (C) No.295/2012 (S.Rajaseekaran V/s. Union Of India & Ors.) has taken up five issues and also given directions relate to (i) Safety of pedestrians while walking on footpaths, (ii) making pedestrian crossings safe (iii) wearing of helmets (iv) Wrong lane driving and unsafe overtaking and (v) Use of dazzling LED white lights, unauthorized sale and misuse of red-blue strobe lights and hooters.

-- Pursuant to the said directions, the Hon'ble Commissioner has constituted the ad-hoc committee. As per the provisions of Section 166 and 166A of Motor Vehicles Act, the design, construction and maintenance of roads shall be in accordance with the standards and specifications of the Indian Road Congress as may be applicable or any other instructions or guidelines issued by the Central Government/State Government from time to time. Pursuant to the directions passed by the Hon'ble Supreme Court, the India Roads Congress has framed comprehensive guidelines under the aegis of the MoRTH called Guidelines for Pedestrian Safety (Second Revision) June, 2022 IRC 103-2022. These Guidelines provide detailed specifications/standards for the design and construction of pedestrian facilities, including footpaths, safe pedestrian crossing. These guidelines also provide minimum clear widths of different zones on footpaths as per adjoining land use. In

the aforesaid order the Hon'ble Court directed to conduct audit of existing pedestrian crossings which shall additionally focus on

i) Requirement of traffic calming measuresas per IRC,

ii) Signage to indicate the existence of pedestrian crossing, with high visibility zebra markings which may be supplemented with reflective materials,

iii) Illumination of pedestrian crossing during night time,

iv) Road dividers should be placed in a manner to prevent pedestrian from crossing road at any other place,

v) the condition and safety of pedestrian subways and FOBs, with upgradation measures including improved LED lighting, CCTV surveilance linked to command centres, clearly demarcated entry and exit points, panic buttons connected to local police stations, and enforceable operation and maintenance standards through contract.

मिरा भाईंदर महानगरपालिकेकडील अपुरा कर्मचारी वर्ग व सदर कामांसाठी पॅनलवर सल्लागार नसल्याने महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार मे. सस्टेनन्सी कंन्सल्टंट प्रा.लि. यांना सल्लागार म्हणुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची "ड" मधील प्रकरण "पाच"दोन"दोन" नुसार मा.आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना प्राधिकृत करणेस ही सभा मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर सल्लागार यांना केलेल्या कामानुसार मंजुर दराने देयक प्रदानासाठी रु.10.00 लक्ष खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

पारीत ठरावानुसार विभागाने कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- श्री. भगवती शर्मा

अनुमोदक :- श्री. विशाल पाटील

ठराव सर्वानुमते वाचून कायम करण्यात आला.

सभापती,
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. १५/०६/२०२६

// ठराव //

प्रकरण क्रं. ५५ : शिक्षण विभाग अंतर्गत कार्यरत ०५ काळजीवाहक यांना मुदतवाढ देणे बाबत.

ठराव क्र. ५२ :

मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात शिक्षण विभागातील विशेष गरजाधारक विदयार्थ्यांचो काळजी घेण्यासाठी एकुण ०५ काळजीवाहक यांची मा. आयुक्त यांच्या दि. २७/०६/२०१६ रोजीच्या मंजुरी अन्वये नेमणुक करण्यात आलेली आहे. तसेच या ०५ काळजीवाहक यांना किमान वेतन कायदयानुसार रु. २४,४२६/- प्रमाणे मानधन अदा करणेस मा. आयुक्त यांनी दि. ११/०९/२०२३ रोजी मंजुरी दिलेली आहे.

सदर काळजीवाहक यांना वेळोवेळी मा. महासभा तसेच मा. स्थायी समिती सभा यांच्या मान्यतेने मुदतवाढ देण्यात येते. मा. प्रशासकीय सभा दि. १४/११/२०२५ प्रकरण क्र. २९६ ठराव क्रं. २९६ नुसार दि. **२७/०९/२०२५ ते २७/०३/२०२६** पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती. ती संपुष्ठात येणार असून त्यांना दि. २८/०३/२०२६ रोजी ०१ दिवसाचा तांत्रिक खंड देणे आवश्यक आहे. तसेच दि. २९/०३/२०२६ रोजी रविवार असल्याने दि. **३०/०३/२०२६ ते ३०/०९/२०२६** पर्यंत सहा महिन्यांच्या कालावधीसाठी मुदतवाढ देणे आवश्यक आहे.

काळजीवाहक तपशील खालीलप्रमाणे

नाव	मुळ नियुक्ती	मानधन	नियुक्ती कालावधी	
			पासुन	पर्यंत
श्रीम. मेघा सावळकर	काळजीवाहक	२४,४२६/-	३०/०३/२०२६	३०/०९/२०२६
श्रीम. सायली चव्हाण	काळजीवाहक	२४,४२६/-	३०/०३/२०२६	३०/०९/२०२६
श्रीम. दिपा भोईर	काळजीवाहक	२४,४२६/-	३०/०३/२०२६	३०/०९/२०२६
श्रीम. गुलाब दिवेकर	काळजीवाहक	२४,४२६/-	३०/०३/२०२६	३०/०९/२०२६
श्रीम. सुनिता गोसावी	काळजीवाहक	२४,४२६/-	३०/०३/२०२६	३०/०९/२०२६

प्रशासनाने सादर केलेल्या गोषवाऱ्यानुसार ०५ काळजीवाहकांना प्रति माह रु. २४,४२६/- प्रमाणे सहा महीन्याच्या कालावधीतील मानधनासाठी अंदाजित ७,३२,७८०/- अक्षरी (सात लक्ष बत्तीस हजार सातशी ऐंशी) इतका खर्च अपेक्षित आहे. सदर खर्च शिक्षण विभागाच्या सोहळा/साहित्य/थेरपी ठोक मानधनावरील क्रिडा शिक्षकांचे/ काळजीवाहक यांचे/ शिक्षक मानधन या लेखाशिर्षातुन अदा करण्यात येणार आहे. तरी उपरोक्त काळजीवाहक यांना दि. ३०/०३/२०२६ ते ३०/०९/२०२६ पर्यंत मुदतवाढ देऊन प्रति माह रु. २४,४२६/- प्रमाणे मानधन अदा करणेकरीता होणाऱ्या अंदाजित ७,३२,७८०/- अक्षरी (सात लक्ष बत्तीस हजार सातशे ऐंशी) इतक्या खर्चास ही सभा मंजूरी देत आहे, असा मी ठराव मांडत आहे.

सुचक

श्री. अनिल र. किराणी

ठराव सर्वानुमते मंजूर

अनुमोदन

श्री. जविन सिंग

मा. सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. १५/९/२०२६

//ठराव//

प्रकरण क्र. 56 :- Video Conferencing Setup करणेकामी ई-निविदा मागविणेस आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत (E 3120541)

ठराव क्र. ५३ :-

भारत सरकारचे विविध विभाग उदा. जनगणना विभाग, SBM, P.M. गतिशक्ती व इतर विभाग, महाराष्ट्र शासनाचे माझी वसुंधरा, सफाई मित्र, शासनाचे नगरविकास विभाग, सामान्य प्रशासन विभाग, माहिती तंत्रज्ञान विभाग, महिला व बालविकास विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय अशा शासनाच्या विविध विभागांच्या बैठकीसाठी या कार्यालयाकडून वेळोवेळी Video Conferencing चे आयोजन केले जाते. मा.आयुक्त सो. यांनी Video Conferencing room तयार करणेबाबत दि.09/03/2026 रोजीच्या बैठकीत निर्देश दिलेले आहेत. सदर Video Conferencing द्वारे शासनाच्या वरील सर्व विभागांशी संभाषण करणे शक्य होते. यामुळे वेळेत मोठी बचत होते. त्याचप्रमाणे मनपाचे प्रभाग अधिकारी व विभागीय कार्यालये यांना वारंवार बैठकीसाठी न बोलावता Video Conferencing द्वारे बैठक आयोजित करुन संवाद साधणे शक्य होणार आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालयात मा. आयुक्त सभागृहात Video Conferencing setup करणेकामी कामाची आवश्यकता आहे. Video Conferencing setup in Meeting room / conference room कामी अंदाजे रु.42,36,010/- (अधिक GST) खर्च अपेक्षित आहे.

प्रशासनाने सादर केलेल्या गोषवाऱ्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण 7 कलम 73 (क) नुसार Video Conferencing Setup करणेकामी ई-निविदा मागविणेस ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे, असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. भगवती शर्मा

अनुमोदन :- श्री. अनिल विरमी

ठराव सर्वानुमते मंजूर

मा. सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. १५/०६/२०२६

// ठराव //

प्रकरण क्र. ५७ : मिरा भाईंदर महानगरपालिकासन 2025-26 व सन 2026-27 या दोन वर्षांकरीता विविध प्रकारचे बोर्ड-बॅनर, होर्डिंग्ज, नेमप्लेट व फलक छपाई करणे कामाच्या निविदेस मान्यता देणेबाबत

ठराव क्र. ५४ :

अ.क्र.	टेंडर आय.डी.	कामाचे नाव	अंदाजित खर्च (GST सह)	निविदाधारकाचे नाव	सादर केलेला दर
१	२	३	४	५	६
१.	२०२६_MBMC_१२७०५८७_१	मिरा भाईंदर महानगरपालिका सन २०२६-२७ या वर्षांकरिता विविध बोर्ड-बॅनर, होर्डिंग्ज, नेमप्लेट व फलक छपाई करणे.	रु. ६०,००,०००/-	मे.एकलव्य इंटरप्रायजेस मे. अस्मी इंटरप्रायजेस मे. समृध्दी इन्फोमिडिया	खालीलप्रमाणे

अ.क्र.	तपशील (Particular)	सन २०२४-२५/ निवडणूक कामी मंजूर दर	मे.एकलव्य इंटरप्रायजेस	मे. अस्मी इंटरप्रायजेस	मे. समृध्दी इन्फोमिडिया
१.	सफेद कापडी बॅनर छपाई करणे. Printing of White Cotton Banner.	रु. २०/- प्र.चौ.फुट	रु. १२/- प्र.चौ.फुट	रु. २०/- प्र.चौ.फुट	रु. १८/- प्र.चौ.फुट
२.	सफेद कापडी बॅनर छपाई करुन तो महानगरपालिकेच्या हद्दीत विविध ठिकाणी बसविणे. Printing & Fixing of White Cotton Banner on various places in MBMC area.	रु. ३०/- प्र.चौ.फुट	रु. १५/- प्र.चौ.फुट	रु. २५/- प्र.चौ.फुट	रु. २८/- प्र.चौ.फुट
३.	सफेद कापडी बॅनर (लाकडी फ्रेम सहित) बनविणे. White Cotton banner (with wooden frame)	रु. ४५/- प्र.चौ.फुट	रु. १६/- प्र.चौ.फुट	रु. ३८/- प्र.चौ.फुट	रु. ४२/- प्र.चौ.फुट
४.	सफेद कापडी बॅनर (लाकडी फ्रेमसहित) बनवून बसविणे. Making & Fixing of White Cotton banner (with wooden frame)	रु. ६०/- प्र.चौ.फुट	रु. २०/- प्र.चौ.फुट	रु. ४२/- प्र.चौ.फुट	रु. ५८/- प्र.चौ.फुट
५.	डिजीटल फ्लेक्स बॅनर छपाई करणे. (१०० Micron पेक्षा जास्त) Printing of Digital Flex banner. (More than १०० Micron)	रु. ७/- प्र.चौ.फुट	रु. १६/- प्र.चौ.फुट	रु. १०/- प्र.चौ.फुट	रु. ६.९०/- प्र.चौ.फुट
६.	डिजीटल फ्लेक्स बॅनर छपाई करुन तो महानगरपालिकेच्या हद्दीत विविध होर्डिंग्ज, कमानी अथवा इतर ठिकाणी बसविणे. (१०० Micron पेक्षा जास्त) Printing & Fixing of Digital Flex banner on various Hoardings, Arches (Kamani) or Other places in MBMC area. (More than १०० Micron)	रु. १५/- प्र.चौ.फुट	रु. १८/- प्र.चौ.फुट	रु. ३५/- प्र.चौ.फुट	रु. १४.५० प्र.चौ.फुट
७.	डिजीटल फ्लेक्स बॅनर (लाकडी फ्रेमसहित) बनविणे. (१०० Micron पेक्षा जास्त) Digital Flex banner (with wooden frame)	रु. १७/- प्र.चौ.फुट	रु. ४०/- प्र.चौ.फुट	रु. ३०/- प्र.चौ.फुट	रु. १६.८० प्र.चौ.फुट
८.	डिजीटल फ्लेक्स बॅनर (लाकडी फ्रेमसहित) बनवून तो महानगरपालिकेच्या हद्दीत विविध ठिकाणी बसविणे. (१०० Micron पेक्षा जास्त)	रु. २५/- प्र.चौ.फुट	रु. ५०/- प्र.चौ.फुट	रु. ३०/- प्र.चौ.फुट	रु. २४.५० प्र.चौ.फुट

अ.क्र.	तपशील (Particular)	सन २०२४-२५/ निवडणूक कामी मंजूर दर	मे.एकलव्य इंटरप्रायजेस	मे. अस्मी इंटरप्रायजेस	मे. समृध्दी इन्फोमिडिया
	Making & Fixing Digital Flex banner (with wooden frame) at various places in MBMC area.(More than १०० Micron)				
९.	ॲक्रेलिक बोर्डवर मजकुर छपाई करुन तो पुरवठा करणे व बसविणे. (Supply & Fixing of Acrylic Board with printing of description at various places in MBMC area.	रु. १८०/- प्र.चौ.फुट	रु. ८५/- प्र.चौ.फुट	रु. १२००/- प्र.चौ.फुट	रु. १७०/- प्र.चौ.फुट
१०.	दरवाज्यावरील / कक्षाबाहेरील नावाची नेमप्लेट ॲक्रेलिक (साईज ६" x१२") Door / Cabin outside Nameplate — Acrylic (Size ६" x१२")	रु. ९०/- प्रती नग	रु. ८०/- प्रती नग	रु. २०००/- प्रती नग	रु. १२५/- प्रती नग
११.	महानगरपालिकेच्या लोगोसह व गोल्डन कलर नावासह ॲक्रेलिक टेबलटॉप (साईज ६" x१२") Table Top with MBMC logo & Golden colour name (Size ६" x१२")	रु. १५०/- प्रती नग	रु. २००/- प्रती नग	रु. १२००/- प्रती नग	रु. १७०/- प्रती नग
१२.	महानगरपालिकेच्या लोगोसह नावाची गोल्डन कलरची स्टील नेमप्लेट बनविणे (साईज १२" x१२") Golden colour steel Nameplates with MBMC Name & Logo (Size १२" x१२")	रु. ३५०/- प्रती नग	रु. ७००/- प्रती नग	रु. २०००/- प्रती नग	रु. ३४०/- प्रती नग
१३.	लोखंडी फलक (फ्रेमसहित) ३mm ॲल्युमिनिअम कंम्पोसिट पॅनल शिट (दिलेला मजकुर विनायल प्रिंट तयार करणे यासह) व त्यास १ इंच जी.आय. स्क्वेअर पाईपची फ्रेम हुकसह महानगरपालिकेच्या हद्दीत विविध ठिकाणी बसविणे. M.S. Board — ३mm Aluminum composite panel Sheet with १ inch G.I.Sq. pipe frame (with Hooks) Matter written with Vinayal Print.	रु. १३०/- प्र.चौ.फुट	रु. १२४/- प्र.चौ.फुट	रु. ६००/- प्र.चौ.फुट	रु. १२५/- प्र.चौ.फुट
१४.	महानगरपालिकेच्या विविध मालमत्तेवर ऑईल पेन्टव्दारे मसुदा रंगविणे. Oil Painting of Matter on various properties of MBMC.	रु. ५५/- प्र.चौ.फुट	रु. ६०/- प्र.चौ.फुट	रु. ९०/- प्र.चौ.फुट	रु. ५०/- प्र.चौ.फुट
१५.	विनायल स्टीकर छपाई करुन तो महानगरपालिकेच्या हद्दीत विविध ठिकाणी चिकटवणे. Printing vinyl sticters and pasting them at various places within the municipal limits.	रु. ४०/- प्र.चौ.फुट	रु. ४५/- प्र.चौ.फुट	रु.३५/- प्र.चौ.फुट	रु.३५/- प्र.चौ.फुट
१६.	वाहन नेमप्लेट (गोल्डन कलर) ३३mm ॲल्युमिनिअम कंम्पोसिट पॅनल. Vehicle Name plat (Golden colour) ३mm Aluminum composite panel.	रु. २००/- प्रती नग	रु. ३२०/- प्रती नग	रु. २२००/- प्रती नग	रु. १८०/- प्रती नग
१७.	टेबलटॉप (ब्लॅक ॲन्ड गोल्ड) (पेस्टींग व प्रिंटींगसह) Table Top. (Black and Gold) (with Pasting and Printing)	रु. ५०/- प्रती नग	रु. ५००/- प्रती नग	रु. १३००/- प्रती नग	रु. ४८/- प्रती नग
१८.	लोखंडी फलक (फ्रेमसहित) ३mm ॲल्युमिनिअम कंम्पोसिट पॅनल शिट. (दिलेला मजकूर बोर्डाच्या एका बाजुस विनायल प्रिंटीग करुन चिटकवणे) व त्यास १ इंच जी.आय. स्क्वेअर पाईपची फ्रेम व १० फुट उंचीचा २ इंचाचा गोल एम.एस.पाईप यासह महानगरपालिकेच्या हद्दीत विविध ठिकाणी बसविणे. (सिमेंट कॉक्रीट मिक्सचरसह)	रु. १८०/- प्र.चौ.फुट	रु. १२०/- प्र.चौ.फुट	रु. १५००/- प्र.चौ.फुट	रु. १७५/- प्र.चौ.फुट

अ.क्र.	तपशील (Particular)	सन २०२४-२५/ निवडणूक कामी मंजूर दर	मे.एकलव्य इंटरप्रायजेस	मे. अस्मी इंटरप्रायजेस	मे. समृध्दी इन्फोमिडिया
	M.S. Board – ३mm Aluminum composite panel Sheet (Given matter with vinayl printing and pasting on one sides of board) with १ inch G.I.Sq pipe frame. & १० feet long round २ Inch M.S. pipe with Fixing in MBMC area at various places. (in cement concrete mixture				
१९.	लोखंडी फलक (फ्रेमसहित) ३mm ॲल्युमिनिअम कंम्पोसिट पॅनल शिट. (दिलेला मजकूर बोर्डाच्या दोन्ही बाजुस विनायल प्रिंटीग करुन चिटकवणे) व त्यास १ इंच जी.आय. स्क्वेअर पाईपची फ्रेम व १० फुट उंचीचा २ इंचाचा गोल एम.एस.पाईप यासह महानगरपालिकेच्या हद्दीत विविध ठिकाणी बसविणे. (सिमेंट कॉक्रीट मिक्सचरसह) M.S. Board – ३mm Aluminum composite panel Sheet (Given matter with vinayl printing and pasting on both sides of board) with १ inch G.I.Sq pipe frame. & १० feet long round २ Inch M.S. pipe with Fixing in MBMC area at various places. (in cement concrete mixture	रु. २१०/- प्र.चौ.फुट	रु. १४०/- प्र.चौ.फुट	रु. १५००/- प्र.चौ.फुट	रु. २००/- प्र.चौ.फुट
२०.	स्टीकर प्रिंटेड ए/४ सिंगल कलर प्रिंट Sticker Printed A४ single colour print	रु. ८/- प्रती नग	रु. ५/- प्रती नग	रु. १०/- प्रती नग	रु. ५/- प्रती नग
२१.	स्टीकर प्रिंटेड ए/४ फोर कलर प्रिंट Sticker Printed A४ Four colour print	रु. १५/- प्रती नग	रु. ९/- प्रती नग	रु. १५/- प्रती नग	रु. ७/- प्रती नग
२२.	स्टीकर प्रिंटेड ए/३ सिंगल कलर प्रिंट Sticker Printed A३ single colour print	रु. १४.५० प्रती नग	रु. ८/- प्रती नग	रु. २०/- प्रती नग	रु. ५/- प्रती नग
२३.	स्टीकर प्रिंटेड ए/३ फोर कलर प्रिंट Sticker Printed A३ Four colour print	रु. २०/- प्रती नग	रु. १२/- प्रती नग	रु. २५/- प्रती नग	रु. १४/- प्रती नग
२४.	स्टीकर प्रिंटेड १५ x ४ सिंगल कलर प्रिंट Sticker Printed १५" x ४ single colour print	रु. ८.७० प्रती नग	रु. ६/- प्रती नग	रु. १५/- प्रती नग	रु. ७/- प्रती नग
२५.	सेल्फी पॉइंड प्रिंटिंगसह (लोखंडी फ्रेम) Selfie point with printing (iron frame)	रु. ५००/- प्र.१८ चौ.फुट	रु. ४५/- प्र.चौ.फुट	रु. २५०/- प्र.चौ.फुट	रु. ८००/- प्र.चौ.फुट
२६.	सेल्फी पॉइंड प्रिंटिंगसह (लाकडी फ्रेम) Selfie point with printing (wooden frame)	-	रु. ४०/- प्र.चौ.फुट	रु. १००/- प्र.चौ.फुट	रु. ५००/- प्र.चौ.फुट
२७.	प्रिटिंगसह ५ मिमी फोम बोर्ड ५ MM Foam Board with Printing	रु. १००/- प्र.चौ.फुट	रु. ४९/- प्र.चौ.फुट	रु. १२०/- प्र.चौ.फुट	रु. ५५/- प्र.चौ.फुट
२८.	सनबोर्ड – पेस्टींग व प्रिटींगसह विनायल Sunboard – Vinyl with printing	रु. ९०/- प्र.चौ.फुट	रु. ४९/- प्र.चौ.फुट	रु. ११०/- प्र.चौ.फुट	रु. ६०/- प्र.चौ.फुट
२९.	सुचना फलक लोखंडी बोर्ड विनायल पेस्टीगसह Notice board iron board with vinyl pasting	-	रु. १२०/- प्र.चौ.फुट	रु. २३०/- प्र.चौ.फुट	रु. ९०/- प्र.चौ.फुट
३०.	ॲल्युमिनियम रोलिंग स्टँडी ३ x ६ चौ.फुट (पेस्टीग व प्रिटींगसह) Aluminum Rolling Stand ३ x ६ Sq.Ft. (Including pasting and printing)	रु. ९००/- प्रती नग	रु. ६००/- प्रती नग	रु. १८००/- प्रती नग	रु. ९५०/- प्रती नग
३१.	लाकडी स्टॅन्डी (पेस्टीग व प्रिटींगसह) Wooden stand (with pasting and printing	-	रु. ४०/- प्र.चौ.फुट	रु. १००/- प्र.चौ.फुट	रु. ३५/- प्र.चौ.फुट
३२.	लोखंडी स्टॅन्डी (पेस्टीग व प्रिटींगसह)	-	रु. ४५/-	रु. १३०/-	रु. ५५/-

अ.क्र.	तपशील (Particular)	सन २०२४-२५/ निवडणूक कामी मंजूर दर	मे.एकलव्य इंटरप्रायजेस	मे. अस्मी इंटरप्रायजेस	मे. समृध्दी इन्फोमिडिया
	Iron stand (with pasting and printing)		प्र.चौ.फुट	प्र.चौ.फुट	प्र.चौ.फुट
३३.	हॅन्डी प्लेकार्ड लाकडी फ्रेमसह (पेस्टींग व प्रिंटींगसह) Handy placard with wooden frame (with pasting and printing)	-	रु. ५०/- प्र.चौ.फुट	रु. १००/- प्र.चौ.फुट	रु. ५०/- प्र.चौ.फुट
३४.	कार्यकाल ॲक्रेलिक बोर्ड, कट लेटर्स सह Tenure acrylic board, with cut letters	-	रु. १५०/- प्र.चौ.फुट	रु. २४००/- प्र.चौ.फुट	रु. २००/- प्र.चौ.फुट
३५.	कार्यकाल ॲक्रेलिक बोर्ड, स्टीकर प्रिंटींग सह Acrylic board with sticker printing	-	रु. ९०/- प्र.चौ.फुट	रु. १५००/- प्र.चौ.फुट	रु. १५०/- प्र.चौ.फुट

प्रशासनाने सादर केलेल्या गोषवाऱ्यातील निविदामधील सहभागी सर्व निविदाधारकांनी सादर केलेल्या दरामध्ये मोठी तफावत दिसुन येत आहे. तसेच सर्वात कमी दर सादर केलेल्या निविदाधारकाचे दर हे किमान 50% व त्यापेक्षाही जास्त फरकाचे दिसुन येत आहेत. त्यामुळे कामाच्या गुणवत्तेमध्ये तडजोड होण्याची शक्यता नाकारता येत नसुन महानगरपालिकेची नाहक बदनामी होण्याची शक्यता असल्याने सदरची निविदा रद्द करून नव्याने निविदा प्रक्रिया करण्यात यावी, असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :-

श्री. अनिल विरणी

अनुमोदन :-

श्री. आनंद दत्तात्रय मांजरेकर

सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका
मा. स्थायी समिती सभा दि. १५/०६/२०२६

// ठराव //

प्रकरण क्र. ५८ :- मिरा भाईंदर महानगरपालिका सन २०२५-२६ व सन २०२६-२७ या दोन वर्षांकरीता विविध प्रकारची स्टेशनरी खरेदी करणे कामाच्या निविदेस मान्यता देणेबाबत.

ठराव क्र. ५५

अ.क्र.	टेंडर आय.डी.	कामाचे नाव	अंदाजित खर्च (GST सह)	निविदाधारकाचे नाव	सादर केलेला दर
१	२	३	४	५	६
१.	२०२५_MBMC_१२५३५५६_१	मिरा भाईंदर महानगरपालिका सन २०२६-२७ या वर्षाकरिता विविध प्रकारची स्टेशनरी खरेदी करणे.	रु. ६०,००,०००/-	मे. ईश्वर एजन्सीस	खालीलप्रमाणे
				मे. केंद्रीय भांडार	
				मे. यश इंटरप्रायजेस	
				मे. आर. के. इंटरप्रायजेस	

अ.क्र	तपशील (Particular)	सन २०२४-२५ मधील मंजुर दर	मे. ईश्वर एजन्सीस	मे. केंद्रीय भांडार	मे. यश इंटरप्रायजेस	मे.आर. के. इंटरप्रायजेस
१.	सफायर पेन्सिल कार्बन ब्ल्यु कोरस कं. (सिंगल साईड) Sapphire Pencil Carbon Blue—Kores Co.(Single side)	रु. १९३/- प्रती बॉक्स	रु.१९०/- प्रती बॉक्स	रु.१९५/- प्रती बॉक्स	रु.२१०/- प्रती बॉक्स	रु.२१०/- प्रती बॉक्स
२.	पेन्सिल कार्बन ब्ल्यु कोरस कं. (डबल साईड) Pencil Carbon Blue —Kores Co. (Double side)	रु. १९७/- प्रती बॉक्स	रु. १९२/- प्रती बॉक्स	रु. २११/- प्रती बॉक्स	रु. २५०/- प्रती बॉक्स	रु. २४०/- प्रती बॉक्स
३.	स्टॅम्प पॅड इंक निळी (१०० एम.एल.बॉटल) (कॅमल/कोरस कं.) Stamp Pad Ink blue (१०० ml Bottle) (Camel /Kores Co.)	रु. ४९०/- प्रती बॉक्स	रु. ४८५/- प्रती बॉक्स	रु. ४९९/- प्रती बॉक्स	रु. ६२०/- प्रती बॉक्स	रु. ४७०/- प्रती बॉक्स
४.	स्टॅम्प पॅड(मोठी साईज-९० मी.मी. x १५९ मी.मी.) कोरस कं.(१बॉक्समध्ये १० नग Stamp Pad(Big Size-९० mmX१५९ mm)(Kores Co.)(१० Pcs.Per Box)	रु. ६१८/- प्रती बॉक्स	रु. ६१५/- प्रती बॉक्स	रु. ६२१/- प्रती बॉक्स	रु. ६३०/- प्रती बॉक्स	रु. ६६०/- प्रती बॉक्स
५.	स्टॅम्प पॅड(मध्यम साईज ७० मी.मी.x१११ मी.मी.)कोरस कं. (१ बॉक्समध्ये १० नग) Stamp Pad (Medium Size ७०mm x १११ mm) (Kores Co.) (१० Pcs. Per Box)	रु. ३८२/- प्रती बॉक्स	रु. ३८०/- प्रती बॉक्स	रु.३९४.९९/- प्रती बॉक्स	रु. ३९०/- प्रती बॉक्स	रु. ४०५/- प्रती बॉक्स
६.	स्केच पेन कॅमल सर्व रंगात-मोठी साईज) (१२ नगांचा सेट) Sketch Pen Set All Colours Camel (१२ No.Pkg)	रु. १८.९८ प्रती सेट	रु.१८.९०/- प्रती सेट	रु. २३.९९ प्रती सेट	रु. २४/- प्रती सेट	रु. २४/- प्रती सेट
७.	गोंदाच्या बाटल्या ७०० एम.एल. (कॅमल कं.) Gum Bottle ७०० ml (Camel Co.)	रु. ५८/- प्रती नग	रु. ५७/- प्रती नग	रु. ११८/- प्रती नग	रु. ६१/- प्रती नग	रु. ५८/- प्रती नग
८.	गोंदाच्या बाटल्या १५० एम.एल. (कॅमल कं.) Gum Bottle १५० ml (Camel Co.)	रु. २५/- प्रती नग	रु. २४.५० प्रती नग	रु. ४२/- प्रती नग	रु. २७/- प्रती नग	रु. २७.५० प्रती नग

अ.क्र	तपशील (Particular)	सन २०२४-२५ मधील मंजुर दर	मे. ईश्वर एजन्सीस	मे. केंद्रीय भांडार	मे. यश इंटरप्रायजेस	मे.आर. के. इंटरप्रायजेस
९.	टाचण्या लायन ब्रँड (३५० ग्रॅमचा बॉक्स) Pin Lion Brand (३५० Grams per Box)	रु. ७८/- प्रती बॉक्स	रु. ७६/- प्रती बॉक्स	रु. ८५/- प्रती बॉक्स	रु. ७२/- प्रती बॉक्स	रु. १०५/- प्रती बॉक्स
१०.	व्हायटिंग पेन — कॅमल कंपनी Whiting Pens (Camel Co.)	रु. १९/- प्रती नग	रु.१८.७०/- प्रती नग	रु. १८.९९ प्रती नग	रु. २३/- प्रती नग	रु. १६.५० प्रती नग
११.	विविध रंगाचे हायलायटर पेन (कॅमल कंपनी) Highlighter Pen of different colours (Camel Co.)	रु. १६.५० प्रती नग	रु. १६/- प्रती नग	रु. १७.४० प्रती नग	रु. १८/- प्रती नग	रु. १५.५० प्रती नग
१२.	यु पिन प्लास्टिक मध्यम साईज (१० पॅकेटचा बॉक्स) U Pin Plastic Medium Size (१० Pkt. Per Box)	रु. १४०/- प्रती बॉक्स	रु. १३५/- प्रती बॉक्स	रु. १३९/- प्रती बॉक्स	रु. १४८/- प्रती बॉक्स	रु. १५०/- प्रती बॉक्स
१३.	सफेद लेस २४" सुपेरिअर (१०० नगांचे बंडल) White Less २४" Superior Quality (१०० Nos. Pkg.)	रु. ३०/- प्रती बंडल	रु. २९/- प्रती बंडल	रु. २९.५० प्रती बंडल	रु. २७/- प्रती बंडल	रु. ३२/- प्रती बंडल
१४.	स्टॅपलर मशिन नं. १० लहान (कांगारु कं.) Stapler Machine No.१० Small Size (Kangaroo Co.)	रु. ३५/- प्रती नग	रु.३४.५०/- प्रती नग	रु. ४४.९९ प्रती नग	रु. ३७/- प्रती नग	रु. ३७/- प्रती नग
१५.	स्टॅपलर पिन नं. १० (कांगारु कं.) Stapler Pin १० No. Kangaroo Co.)	रु. ५.९५ प्रती पॅकेट	रु. ५.९२/- प्रती पॅकेट	रु. ७.२५/- प्रती पॅकेट	रु. ६/- प्रती पॅकेट	रु. ६/- प्रती पॅकेट
